॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड  Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२४–२५/४११ दिनांक : ०४/०३/२०२५

**परिपत्रक**

प्रति,
मा.प्राचार्य / रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: १८ ते २५ वयोगटातील युवक युवतीनी विकसित भारत युवा संसद २०२५ मध्ये सहभाग घेण्याबाबत

संदर्भ: श्री अजय शिंदे, क्षेत्रीय निदेशक, रासेयो क्षेत्रीय निदेशालय पुणे यांचा दिनांक ०३ मार्च २०२५ ई–मेल.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय ई–मेल अन्वये श्री अजय शिंदे, क्षेत्रीय निदेशक, रासेयो क्षेत्रीय निदेशालय पुणे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत नांदेड, लातूर,परभणी व हिंगोली जिल्ह्यातील १८ ते २५ वयोगटातील युवक युवतीनी विकसित भारत युवा संसद २०२५ मध्ये सहभाग घेण्यासाठी दिनांक २७ फेब्रुवारी ते ९ मार्च २०२५ पर्यंत आपली नोंदणी (mybharat.gov.in) माय भारत पोर्टलवर करावी. जिल्हास्तरावरील निवड प्रक्रिया दिनांक १५ व १६ मार्च २०२५ रोजी जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथे संपन्न होणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना बस किंवा रेल्वेचे प्रवास खर्च साधे तिकीट आयोजकाच्या वतीने मूळ तिकीट सादर केल्यानंतर देण्यात येईल. तत्पूर्वी ९ मार्च २०२५ पर्यंत युवक युवतीनी माय भारत पोर्टलवर विकसित भारत युवा संसद २०२५ सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे अनिवार्य आहे.

विषय -What does Viksit Bharat mean to you?
भाषा मराठी, हिंदी, इंग्रजी
वय २४ फेब्रुवारी २०२५ रोजी २५ वर्षे असणे

व्हिडिओ तयार करताना नाव जिल्हा, राज्य या क्रमाने लिहावे. पाठीमागे कुठलाही प्रकारचा आवाज नसावा. स्पष्ट असा आवाज असावा २५ एम.बी. पेक्षा मोठा व्हिडिओ नसावा. उच्चार स्पष्ट असावेत. व्हिडिओ फक्त एकच मिनिटाचा तयार करावा, किंवा व्हिडिओ युट्युब वर अपलोड करून youtube ची लिंक माय भारत पोर्टलवर युवकांनी अपलोड करणे अनिवार्य आहे. अंतिम मुदत ९ मार्च २०२५ आहे.

व्हिडियो फॉरमॅट - mp4,mkv,mov,mpeg,avi,wmv,flv.

यामधून निवडलेल्या 150 विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरीय चार जिल्हयांचे (नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली) निवड शिबिर जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथील विकसित भारत युवा संसद २०२५ मध्ये सहभाग घेता येईल. सदरील युवा संसद ही १८ ते २५ वयोगटातील सर्व युवक युवतींना खुली असून महाविद्यालयात शिक्षण घेत असलेले व महाविद्यालय बाहेरील इच्छुक युवक युवतींना यामध्ये सहभाग घेता येईल. तरी जास्तीत जास्त युवकांनी या युवा संसदेमध्ये सहभाग घेऊन देशाचे पंतप्रधान यांच्याशी विकसित भारत २०४७ या विषयाच्या अनुषंगाने आपणास संवाद साधण्याची संधी युवा कार्य व क्रीडा मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विकसित भारत युवा संसद २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी खालील प्रमाणे लिंक देण्यात आली आहे.
https://mybharat.gov.in/pages/event_detail?event_name=Viksit-Bharat-Youth-Parliament-Nodal-district-%E2%80%93-Nanded&key=624101366867

डॉ.मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.